# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय
सर्व्हे नं - १३०/९ - ११, मोहननगर, चिंचवड, पुणे — १९ .
कार्यालय दुरध्वनी क्र.-०२०-२७४६२४८६, ०२०-२७४६२५१४.
ई-मेल- mschinchwad.esis@gmail.com


महाराष्ट्र शासन

वैअ/राकावियो/रुग्णा/जडसंग्रह/निर्लेखीत विभाग/वैद्यकीय उपकरणे/१३२१/२०२६.दि.
24 FEB 2026

विषय :— महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर वैद्यकीय अधीक्षक, रा.का. वि.योजना रुग्णालय मोहननगर चिंचवड पुणे येथील निर्लेखित व निरुपयोगी वैद्यकीय उपकरणे विक्रिबाबत दरपत्रके मागविण्यासाठी जाहिरात अपलोड करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, वैद्यकीय अधीक्षक, यांचे कार्यालय, रा.का.वि.योजना रुग्णालय मोहननगर चिंचवड पुणे येथील महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र. जीएकसी—१०१६/प्र.क्र.०७/१६/विनियम,दि.२२.०६.२०१६ नुसार निर्लेखित केलेले निरुपयोगी सोबतच्या यादी प्रमाणे वैद्यकीय उपकरणे विक्री करणेबाबत दर पत्रकांचे स्वतंत्र पाकीट व आवश्यक असलेले कागदपत्रे दोन्हीचे एक पॉकेट तयार करुन सिलबंद पाकिटात भरुन पाठवाव्यात.

तसेच दि. २४.०२.२०२६ ते दि. १०.०३.२०२६ या कालावधीत सकाळी ११.00 ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत पोहचतील अशा मोहरबंद पाकिटामध्ये पाठवाव्यात. विहित वेळेतील प्राप्त निविदा दि. १२.०३.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता वैद्यकीय अधिक्षक यांच्या दालनात त्यांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकानां उपस्थित राहण्यास परवानगी आहे. सदर निविदाधारक हजर न राहील्यास त्याच्या गैरहजेरी मध्ये निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. याबाबत निविदाधारकचे कोणतेही आक्षेप असल्यास ते मान्य करण्यात येणार नाही.

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, सोबतच्या नमुन्यातील सिलबंद दरपत्रके मागविणारी जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर कृपया जाहिरात अपलोड करण्यात यावी, हि विनंती.

(सोबत निविदा नमुना अटी,शर्ती व विक्री करण्यात येणा—या वैद्यकीय उपकरणे नावाची यादी जोडली आहे.)

भवदीय,

(डॉ. वर्षा सुपे)
**वैद्यकीय अधीक्षक**
रा.का.वि.यो रुणालय, मोहननगर,
चिंचवड,पुणे—१९.

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय
सर्व्हे नं - १३०/ ९ - ११, मोहननगर, चिंचवड, पुणे — १९ .
कार्यालय दुरध्वनी क्र.-०२०-२७४६२४८६, ०२०-२७४६२५१४.
ई-मेल- mschinchwad.esis@gmail.com

## निविदा संदर्भातील अटी व शर्ती

१. मोहरबंद पाकिटात निविदा **दिनांक २४.०२.२०२६ ते दिनांक १०.०३.२०२६** या कालावधीत **सकाळी ११.०० ते ४.३० वाजेपर्यंत** (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वैद्यकीय अधिक्षक राज्य कामगार विमा योजना, मोहननगर,चिंचवड, पुणे १९ येथे सादर करावी. सदर वस्तुंचा नावानिशी स्पष्ट उल्लेख असावा.

२. 'जसे आहे तशा स्थितीत' विक्रिकरीता असलेल्या वस्तु वैद्यकीय अधिक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय मोहननगर, चिंचवड, पुणे येथील रुग्णालयात ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर नावानिशी वस्तुंच्या निविदा सादर करणाऱ्या इच्छुकाला निविदेमधील सामान पाहण्यासाठी रुग्णालय मोहनगर चिंचवड, पुणे या ठिकाणी **दिनांक ०४.०३.२०२६ ते ०६.०३.२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत** पाहता येईल. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही दिवशी सामानाची पाहणी करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

३. तसेच सोबत जोडलेल्या यादीतील अ.क्र. १ ते अ.क्र. ५२ पर्यंतच्या सर्व निर्लेखित व निरुपयोगी वैद्यकीय उपकरणची **आपेक्षीत एकुण रक्कम रु.४५०००/- अधिक अशी आहे.**

४. ज्यांना रजिस्टर पोष्टाने निविदा पाठवायची आहे. त्यांनी **दिनांक १०.०३.२०२६** पर्यंत सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने पाठवावी. अन्यथा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.

५. इसाऱ्याची **रक्कम रु.१०,०००/-** रक्कमेचा ADMN OFFICER, ESIS HOSPITAL MOHANNAGAR. A/C NO.१०१४६१३०८७० या नावाने डिमांड ड्राप्ट अथवा रोखरने कार्यालयातील रोखपाल यांच्याकडे जमा करावे. व **इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. दरपत्रकांचे दर अंकामध्ये आणि अक्षरा मध्ये लिहावेत.**

६. दर पत्रकांचे स्वतंत्र पाकीट व आवश्यक असलेले कागदपत्रे स्वतंत्र पाकीट असे दोन्ही पाकीटे तयार करुन सिलबंद एका पाकिटात भरुन पाठवाव्यात.(**Technical and Financial** ची वेगवेगळी पाकीटे एकाच पाकीटात घालावीत.)

७. ज्या निवीदा धारकांनी इसाऱ्याची रक्कम भरलेली आहे. परंतू ज्यांची निविदा बाद झाली असल्यास त्यांची अमानत रक्कम परत केली जाईल.

८. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

९. निविदा पाकीटावर खरेदीधारकाने आपले संपूर्ण नाव व पत्ता मोबाईल नंबर नमुद करावा. तसेच कोणकोणत्या कारणासाठी निविदा सादर करत आहे ते पाकीटावर नमूद करावे.

१०. यशस्वी निविदाधारकास, निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एका आठवडयात वस्तूंचा ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्द बातल ठरविली जाईल व इसार रक्कम जप्त करुन शासन खाती जमा करण्यात येईल.

११. यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पुर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. वैद्यकीय अधिक्षक, राज्य कामगारविमा योजना रुग्णालय, मोहननगर, चिंचवड, पुणे हे कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळू शकतात.

१३. जर वैद्यकीय उपकरणे व जडसंग्रह वस्तुंची योग्य ती किंमत निविदाधारकाकडून न आल्यास निविदा नामंजूर करणे, स्थगीती देणे तेसच कोणतीही पुर्व सुचना न देता निविदा रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांनी राखून ठेवले आहेत.

१४. सदर वस्तू खरेदी हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल.

१५. प्रशासकीय किंवा तांत्रीक कारणास्तव वरील निविदा सादर करावायाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

१६. पॅनकार्ड/ जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र/महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ नमुना "ग" प्रमाणपत्र/ इनकमटॅक्स रिटर्ण मागील वर्षाचा/ संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र/संस्थेच्या सचिवाचे सहमती पत्र/ आधार कार्ड, गूमास्ता/उद्यम रजीस्ट्रशन प्रमाणपत्र इत्यादी दस्ताऐवज असणे बंधनकारक आहे. सदर दस्तऐवज बंद पाकिटामध्ये सादर करावे.

१७. ज्या निविदा धारकांची निविदा मंजूर करण्यात आल्यापासून ७ दिवसांच्या आत सुट्टीचे दिवस वगळून दरपत्रकात नमुद रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रक्कम न भरल्यास सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

१८. निरुपयोगी साहीत्य ताब्यात घेताना रुग्णालयाच्या इमारतीचे अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदी दारास नुकसानीबाबत जबाबदार धरुन संबंधीताकडून नुकसानीची वसूली करण्यात येईल.

१९. खरेदीदारास खरेदी रक्कमेवर नियमाप्रमाणे सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. यामधून कोणत्याही प्रकारची सुट देण्यात येणार नाही. कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील.

२०. दर पत्रकावर खरेदीदाराची स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे. स्वाक्षरी नसल्यास दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही.

अध्यक्ष तथा वैद्यकीय अधीक्षक
निर्लेखन समिती
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय,
राज्य कामगार विमा योजना,
मोहननगर,चिंचवड, पुणे १९.

# प्रयोगशाळा विभाग, निर्लेखन साहित्यांची यादी.

| अ.क्र. | उपकरणाचे नांव | सिरियल क्रमाक | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | Auto Techinicon | Panchal Scifintic Corporation SR No 34 | 1 |
| 2 | Balance Scale Counter with Weight Box | | 1 |
| 3 | Blood Cell Counter | ERMA PC607SRNO7901 | 1 |
| 4 | BOILING WATER BATH | | 1 |
| 5 | Centrifuge | REMI 1086 | 1 |
| 6 | Centrifuge | REMI 86 | 1 |
| 7 | CENTRIFUGE | Remi 5289 | 1 |
| 8 | CENTRIFUGE | YORKO | 1 |
| 9 | CENTRIFUGE Digital | YORKO | 1 |
| 10 | Centrifuge Hand Working | | 1 |
| 11 | Digital Colorimeter | CORONA | 1 |
| 12 | Diluter cum dispenser | ERBA AUTO DIL.209205 TRANS ASIA | 1 |
| 13 | Distillation Appratus | 83/4/1/74 | 1 |
| 14 | Colorimeter | AE11 | 1 |
| 15 | **HOT AIR OVEN** | | **1** |
| 16 | HOT AIR OVEN | SISCO | 1 |
| 17 | INCUBATOR | Model 109-75 | 1 |
| 18 | INCUBATOR | 109-75 | 1 |
| 19 | INCUBATOR | RAUT IND | 1 |
| 20 | INCUBATOR | JINDAL SCI | 1 |
| 21 | Inoculation Hood | | 1 |
| 22 | Knife Sharpner | panchal sci corp107 | 1 |
| 23 | Microtome Tissue Section Cutting Machine | Sr.17 | 1 |
| 24 | MICROSCOPE BINOCULAR | CXR II DE Winter opt. | 1 |
| 25 | MICROSCOPE BINOCULAR | CXRII Winter opt. | 1 |
| 26 | MICROSCOPE BINOCULAR | LABOVISION 004942 | 1 |
| 27 | MICROSCOPE BINOCULAR | VHS BBM-1 | 1 |
| 28 | MICROSCOPE BINOCULAR | VHS BBM-3 | 1 |
| 29 | MICROSCOPE MONOCULAR | VHS BBM-1 | 1 |
| 30 | MICROSCOPE MONOCULAR | | 1 |
| 31 | MICROSCOPE MONOCULAR | | 1 |
| 32 | INCUBATOR | RMH4 SRNO023292 | 1 |
| 33 | MICROTOME | Towa India. | 1 |
| 34 | NEEDLE AND SYRINGE CUTTER | NON ELECTRICAL | 1 |
| 35 | NEEDLE AND SYRINGE CUTTER | NON ELECTRICAL | 1 |
| 36 | NEEDLE DESTROYER | | 1 |
| 37 | NEEDLE DESTROYER | | 1 |
| 38 | Semi Auto Analyser | RANBAXYASP 300 | 1 |
| 39 | Semi Auto Analyser | ERMA Chem 5 Model EC5 Transasia | 1 |
| 40 | SUCTION APPARATUS | | 1 |
| 41 | TISSUE FLOATIG BATH with Regalater | | 1 |

| | | | |
|---|---|---|---|
| 42 | TISSUE FLOATING BATH with Regalater | | 1 |
| 43 | VDRL ROTATOR | | 1 |
| 44 | VDRL SHAKER | | 1 |
| 45 | VORTEX MIXER WITH SPEED | | 1 |
| 46 | WATER BATH | | 1 |
| 47 | WATERBATH | SISCO | 1 |
| 48 | Weighing Balance for Blood Bag | Ishida domastic USA | 1 |
| 49 | Weighing Balance for Blood Bag | Ishida domastic USA | 1 |
| 50 | Weighing Balance for Blood Bag | | 1 |
| 51 | WEIGHING MACHIENE OBLONG | | 1 |
| 52 | O2 Meter | | 1 |

वैधकीय अधीक्षक
रा.का.वि.यो. रुग्णालय
मोहननगर, चिंचवड, पुणे-१९